**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>**

मंगळवार, दि. १४.०२.२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. देशमुख मंगला गजानन, सभापती**

**<u>सर्वश्री</u>**

| | |
|---|---|
| तेहरा अनुजा अमितसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| शर्मा पुष्पाताई राजेश | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | स. जानी म. कासीम |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| जाधव जयश्री आनंद | अंजुम बेगम शेख अफरोज |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्राधिकारी अधिकारी तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (महसुल) तथा मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवार, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**उमेश चव्हाण** तत्कालीन नगरपालिकेचे सभापती श्री कुमरय्या मुदीराज यांचे दुखद निधन झालेले असुन त्यांना श्रध्दांजली अपर्ण करण्याचा प्रस्ताव मांडतो.

**कल्याणकर बालाजी** श्री उमेश चव्हाण यांनी श्रध्दांजली अपर्ण करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे व सर्व सभागृहाचे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री उमेश चव्हाण यांनी तत्कालीन नांदेड नगरपालिकेचे सभापती श्री कुमरय्या मुदीराज यांचे दुखद निधान झालेले आहे त्यांना श्रध्दांजली अपर्ण करण्या बाबत जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. ११८** **ठराव**

तत्कालीन नांदेड नगरपालिकेचे सभापती श्री कुमरय्या मुदीराज यांचे दुःखद निधन झालेले असल्यामुळे त्यांनाही ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते भावपुर्ण श्रध्दांजली अपण करते व त्यांच्या कुटूंबियावर ओढावलेल्या दुःखात सहभागी होते.

**सौ.अनुजा तेहरा** नव निर्वाचीत सदस्य स्थायी समितीचे सदस्य निवडून आलेले आहेत. त्यांचे या स्थायी समितीच्या पहील्या सभेत त्यांचे स्वागत करण्यात यावे. त्यांना पुष्प गुच्छ देवून स्वागत करावे अशी मी मा. सभापती महोदय यांना विनंती करते.

**सभापती** नव निर्वाचित सदस्याचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात येते.
(सर्वाचे नांव घेवून एक एक सदस्य यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.)

**उमेश चव्हाण** आज नवनिर्वाचित सदस्याचे पहिलीचे मिटींग आहे त्यांचे स्वागत सभापती महोदयांनी केले मी सभापती यांचे सुध्दा पहिलीचे मिटींग असल्याने त्यांचे देखील स्वागत करतो अभिनंदन करतो. (सभापती महोदयांचे स्वागत करण्यात आले)

**सय्यद जानी** आज स्थायी समितीची पहीलीच सभा आहे. मी अशी विनंती करतो की, सभापती साहेबांनी आमची कामे राहीलेल्या वेळेत करुन दयावीत.व अधिका-यांनी सुध्दा आमच्या शिल्लक राहीलेल्या महिन्यामध्ये योग्य मार्गदर्शन करावे अशी मी त्यांना विनंती करतो व सभापतीचे अभिनंदन करतो.

**सौ.अनुजा तेहरा** स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत एक केंद्र शासनाची टिम आली होती या टिमला आपण थ्री स्टार हॉटेलमध्ये ठेवले व त्याचा खर्च किती झाला तो खर्च कोणत्या अधिका-यांने केला आहे. जी टिम आली होती त्या टिमने औरंगाबाद येथे जी बाब झाली आहे आणि ती बातमी आपणास पेपरच्या माध्यमातुन कळाले आहे. त्यांच्यावर मनपामधुन केलेला खर्च किती व तो कोणी केला याची माहिती सभागृहात देण्यात यावी.

**उपआयुक्त** स्वच्छ भारत अभियांनाअंतर्गत केंद्र शासनामार्फत एक टिम नियुक्त केली आहे. ती टिम नांदेडला येवून गेली ही बाबत सत्य आहे ते नांदेडमध्ये सिटी प्राईड या हॉटेलमध्ये मुक्कामी होते. परंतू त्यांना हॉटेल बुक आपण केले त्याचे पैसे मनपाने दिलेले नाही. केवळ त्यांना दुपारचे एका वेळचे जेवनच त्यांना पाहुण्याचा आदरातिथ्य म्हणुन केले आहे. जी औरंगाबादला जसे झाले तसे नांदेड मनपाकेकडून करण्यात आले नाही. आता शासनाने नविन एक टिमची नियुक्ती केली आहे. ती टिम पुन्हा येणार आहे.

**सौ.अनुजा तेहरा** अशा घटना मनपात घडू नये. जनमानसात मनपाची प्रतीमा मलीन होवू नये. एवढीच इच्छा आहे.

**उमेश चव्हाण** नांदेडमध्ये जे काम झाले आहे ते काम केवळ अधिकारी सक्षम असल्यामुळे पुर्ण झालेले आहे. त्यामुळे मनपाकेत अशा घटना होणार सुध्दा नाहीत याची आम्हाला खात्री आहे. परंतू उच्चपदस्थ अधिकारी अशामध्ये फाईलवर वेगवेगळया अधिका-यांचा अहवाल घेण्यात यावा असे लिहीत आहेत त्यामुळे कामे प्रलंबित राहत आहेत. एकदा काम मंजूर झाल्यावर पुन्हा अलेप मुलेपची परवानगी आवश्यक नाही तरी देखील अलेप मुलेपचा अहवाल घेण्यात येत आहे. येणा-या भविष्यात उन्हाळा लागणार आहे. सध्या एएमआरसीचे कामे घेण्यास कोणीही तयार नाही. पाणी गळती झाली तर ते कोण दुरुस्त करणार आपल्याकडे कंत्राटदार का येत नाहीत ते आपल्याकडे काम करण्यास तयार नाहीत अशा परिस्थितीत जी काही कामे झालेली आहेत ती वरिष्ठांच्या मौखीक सुचनेनुसार करण्यात आलेली आहेत. त्या अधिका-यांना संरक्षण देणे आवश्यक आहे. मागील वर्षी जुन्या शहरात ४० लाखाची पाईपलाईन टाकण्यात आली होती. त्या एजन्सीला आतापर्यंत पैसे दिलेले नाहीत. त्यामुळे त्या एजन्सीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. येणा-या काळात अमृत योजना शहरात येणार असून या योजनेत काम करण्यासाठी कोणताही गुत्तेदारसमोर येणार नाही. श्री अंधारे साहेब पाणी पुरवठयाचे आसना नदिवरील काम झाले किंवा नाही याची माहिती दयावी.

**कार्यकारी अभियंता पापु** देगलूर नाका ते चौफाळा हे काम आपण केले असुन फक्त जोडणीचे काम शिल्लक राहीले आहे.

**उमेश चव्हाण** सदरील काम हे तत्कालीन मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांच्या आदेशान्वयेकरण्यात आले आहे. सभापती महोदया आपल्या स्थायी समितीमार्फत आयुक्त साहेबांना पत्र देवून उपस्थित राहण्याबददल सांगावे.

**उप आयुक्त** मा.आयुक्त हे सभेचे कामकाज पुर्णपणे करण्यासाठी अधिका-यास प्राधिकृत करु शकतात. त्यानुसार कामकाज चालत असते. आपणास वाटल्यास त्याबाबत आपण ठराव पारीत करु शकता.

**उमेश चव्हाण** येणा-या काळात निवडणुका आहेत. त्यासाठी आमच्या वार्डातील कामे झाली पाहीजेत अशी आमची भुमीका आहे. पुढे उन्हाळा आहे पाणी टंचाई निर्माण झाली तर आम्ही काय घागर मोर्चा काढायचा काय. वेळ पडल्यास तेही करुन पण असे न करता आमच्या वार्डातील कामे तत्काळ निकाली काढावे. नगरसचिवाच्या मार्फत आयुक्तांना पत्र देण्यात यावे.

**सभापती** मा. आयुक्त साहेबांनी एएमआरसीचे कामे त्वरीत निकाली काढावे.

**स.जानी** पाण्याचा प्रश्न हा अत्यंत गंभीर आहे. माझ्या भागात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. आपल्याकडे पाण्याचे टँकर केवळ दोन आहेत. एक तुटलेले टँकर आमच्या भागात पाठवण्यात आले तेथे या सुविधा पुरविण्यात याव्यात. ज्या ठिकाणी नविन पाईप लाईन टाकावयाच्या आहेत. त्या दोन महिण्यात टाकण्यात यावी.शहरात ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता असेल तेथे टँकरची व्यवस्था करुन वाढ करण्यात यावी. तरोडा भागात पाण्याची फार मोठी समस्या आहे. त्यामुळे ती सुध्दा सोडविण्यात यावी.

**तुलजेश यादव** जुन्या नांदेड मध्ये पाण्याची मोठी समस्या आहे त्यामुळे आसण नदीवरील पाणी हे चौफाळयाच्या पाण्याच्या टाकीला जोडून या भागातील नागरीकांना पाण्याची सोय करण्यासाठी पाईप लाईनचे काम करण्यात आले कारण ही योजना विष्णुपरी जलाशयातील पाणी संपल्यानंतर पर्यायी व्यवस्था म्हणुन पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आली होती हे काम तत्कालीन आयुक्तांनी करुन घेतले होते त्या भागात देगलूर नाका ते चौफाळा येथील क्रॉस कनेक्शनचे काम शिल्लक आहे ते पूर्ण झाल्यावरच त्या कत्रांटदाराचे बिल देण्यात यावे अशी माझी विनंती आहे. या उन्हाळयात हे काम झाल्यास त्याचा फायदा जुन्या नांदेडातील लोकांना होईल.

**उपआयुक्त** गेल्या वर्षी पाण्याची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झाली होती त्यामुळे आपण पर्यायी व्यवस्था म्हणून इसापुर धरणाचे पाणी आसना नदित घतले होते. आणि ते पाणी थेट आपणा चौफाळयाच्या जुन्या शहराला देण्यासाठी पाईप लाईनची करण्यात आली होती. इसापुर धरणात 30 एमएमक्यु पाण्याचा साठा असुन जर एकदा पाणी घेतले तर ते पाणी नांदेड शहरात किमान 15 दिवस पुरेल एवढी सोय आपणास होईल. मागील तीन वर्षापासुन पाऊस न झाल्यामुळे पाण्याची पातळी खाली गेली होती. म्हणुन नागरीकांचे बोअरवेल देखील आटले होते. परंतू यावर्षी आपणास एवढी पाण्याची गंभीर समस्या निर्माण होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्या चांगल्या आहेत त्याला पर्यायी व्यवस्था म्हणुन काही उपाय योजना करणे अत्यंत गरजेचे आहे. काही भागात पाणी वर चढत नाही त्यामुळे ॲक्रची सोय करणे गरजेचे आहे आसना नदिचे पाणी जे जुन्या नांदेड शहरात पोहचू शकत नासल्यामुळे आपल्यामुळे पाईप शिल्लक होते. म्हणून ही कामे हाती घेतली होती. त्यामध्ये निवीदा प्रक्रिया न करता काम करुन घेण्यात आले आहे ही वास्तविक

परिस्थीती आहे. या पाईपा पाईनचे काम वास्तविकता पुर्ण केले आहे. जो जोडण्याचा विषय आहे तो पुर्ण करुन घेण्यात येईल.

**बाळासाहेब देशमुख(तरोडा)** गतवर्षी प्रचंड दुष्काळ होता यावर्षी आपल्या नांदेडला पाण्याचा दुष्काळ राहणार नाही कारण आपण धरण भरलेले आहे. परंतू जे काही गळती होत आहे ती थांबवण्याचे काम प्रशासनाने करावे. पाणी वाया जावू नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी. आपणास जेवढे पाणी आवश्यक आहे तेवढे पाणी आधीच आरक्षीत करावे. असा अहवाल मा. जिल्हाधिकारी नांदेड यांना पाठवावा. मागील वर्षी पाणी टंचाईचा प्रश्न श्री अंधारे यांनी योग्य प्रकारे हाताळला त्याबददल मी त्यांचे अभिनंदन करतो. शिक्षणाधिकारी साहेबांनी एक चांगली प्रकत गुणवत्ता शिक्षण योजना राबविली आहे त्याबददलमी त्यांचे ही अभिनंदन करतो. मनपाच्या शाळेत विदयार्थ्यांची संख्या वाढली पाहीजे व शैक्षणिक गुणवत्ता देखील वाढली पाहीजे. येत्या काळात जे काही निर्णय घ्यावयाचे आहेत ते तात्काळ घेण्यात यावे. शहराचा विकास कसा होईल याकडे आम्ही सर्व स्थायी समिती सभापती व सदस्य याचा विचार करु.

**तुलजेश यादव** एटुझेड कंपनीने आपल्या मनपाची फसवनुक केली आहे शहरात ठिक ठिकाणी कच-याचे ढिगारे दिसुन येत आहेत. त्यात या कंपनीवर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यात यावा. त्यांचे जे डिपॉजिट आहे ते जप्त करण्यात यावे.

**सय्यद जानी** लेबर कॉलनी, आंबेडकर नगर, नवि आबादी, श्रावस्तीनगर या भागात पाण्याची अत्यंत टंचाई आहे या भागामध्ये पाईपलाईनची व्यवस्था करुन त्यांना भरपुर पाणी मिळेल याची सोय प्रशासनाने करावी.

**सौ. जयश्री जाधव** या पहील्या विषयाची माहिती देण्यात यावी. हा विषय आम्हाला वाचुन दाखविण्यात यावा.

**उमेश चव्हाण** स. सदस्यांनी जी माहिती मागविली आहे ती माहिती त्यांना देण्यात यावी.

**तुलजेस यादव** स.सदस्यांनी जी माहिती मागीतली आहे ती माहिती त्यांना देण्यात यावी.

**सौ. जयश्री जाधव** मागील बैठकीत इतीवृत कायम करण्यापुर्वी आम्हाला ते वाचून दाखविण्यात यावे.

**उप आयुक्त** मागील बैठीत इतीवृत आहेत दिनांक 16.12.2016 व दि.30.11.2016 या मध्ये एका निवडणुकीची प्रक्रिया आहे ती आपणास वाचु दाखवा म्हणत असल तर ते आम्ही वाचून दाखवू . दिनांक 30.11.2016 चे इतिवृत वाचून दाखवावे.

**सभापती** इतिवृत्ताची प्रत स.सदस्यांना देण्यात यावी. स.सदस्याना जी काही माहिती पाहिजे ती नगरसचिवांनी दयावी.

**तुलजेश यादव** स. सदस्यांनी जी माहिती पाहिजे आहे ती माहिती लेखी मध्ये देण्यात यावी.

**विषय क्रं.०१**

दि. ३०.११.२०१६, व दि. १६.१२.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**उमेश चव्हाण** इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात यावी

**तेहरा अनुजा** श्री उमेश चव्हाण यांनी इतिवृत्त कायम करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते

**ठराव क्रं. ११९** **ठराव**

दि. ३०.११.२०१६, व दि. १६.१२.२०१६ रोजी मागील झालेल्या स्थायी समितीच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.०२**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/स्वमअ/११३५०/१६ दिनांक २८.११.२०१६ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत अभियानाची जनजागृती करणे यात माहिती, शिक्षण व प्रसार (IEC) साठी निविदा सुचना क्रं. स्वमअ/१५०३५/२०१६ दिनांक १५.०२.२०१६ नुसार मागविण्यात आल्या होत्या यामध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. दक्ष फाऊंडेशन नांदेड यांची असून ती खालील अटी व शर्तीनुसार आहे.

<u>अटी व शर्ती</u>

१) कार्यालयीन - जागा मनपाने उपलब्ध करुन द्यावी व लाईट बील, टॅक्स संस्था देईल.

२) साहित्य स्टेशनरी - ८०००/- प्रती महिना

३) प्रशिक्षण कार्यक्रम -

A) प्रशिक्षण हॉल रु. ७०००/- किमान ( ज्या भागात किंवा जवळच्या परिसरात मनपाकेची इमारत/शाळा/सांस्कृतिक सभागृह उपलब्ध असल्यास ते उपलब्ध करुन देण्यात यावे यापैकी कांही उपलब्ध नसल्यास जागा भाडयाने घेतल्यास त्या जागेचा भाडयाचे किमंत किंवा रुपये ७०००/- या पैकी जे कांही असेल ते देय राहील.

B) प्रशिक्षण सामुग्री :- (१) ओळखपत्र (२) नोट पॅड, पेन (३) प्रमाणपत्र

C) चहा (दोन वेळेत), (D) नास्ता, (E) दुपारचे जेवण, (F) ध्वनीक्षेपक, (G) सजरंजी, टेबल, खुर्ची, (H) व्हाईट बोर्ड, मार्कर, डस्टर, (I) प्रवास, (J) पुष्पगुच्छ, (K) फोटो, व्हिडीओशुटींग (०१ सीडी) फोटो २० पोस्टकार्ड साईज देण्यात येतील. यासाठी एकूण खर्च खालील प्रमाणे.

प्रति प्रशिक्षण = प्रति व्यक्ती X प्रशिक्षणार्थी

२०० X १०० = २००००/- प्रशिक्षण -१

<u>२००००/- प्रशिक्षण -२</u>

एकूण ४००००/-

४) रॅली (एकूण ४) १) हॅन्ड स्टीक रुपये १५X१०० = १५००/-

२) बॅनर रुपये ३००X२ = ६००/-

(हॅन्ड स्टीक साईज लिगल पेपर व बॅनर वर्षातुन एकदाच एकाच वेळी करुन ते वर्षभर वापरण्यात येतील.)

३) ध्वनीक्षेपक रुपये ५०० भाडेतत्वावर प्रती रॅली

**<u>एकूण २६००/-</u>**

५) प्रचार व प्रसारासाठी प्रति दिवस प्रमाणे ४ दिवस प्रति महिला

१) अटोरिक्षा रुपये ४०००/- महिण्यातील ०४ पुर्ण दिवस

२) हॅन्ड बील रुपये १०००/- प्रति १००० नगांसाठी महिण्यातुन दोनदा प्रमाणे २०००/-

३) स्टीकर (२०००) वर्षातुन फक्त एकदाच छापावे लागतील

प्रति रुपये ५ A४ साईज रुपये १००००/-

**<u>एकूण रुपये १६०००/-</u>**

६) प्रवास खर्च

१) ओरियनटेशन भेटी

२) साधन वयक्तीसाठी (ओरियनटेशन भेटीसाठी) गेस्ट हा पुणे, औरंगाबाद, मुंबई किंवा नागपुर या भागाकडील असल्यास किंवा मराठवाडयाच्या बाहेरील असल्यास रुपये १००००/- प्रमाणे प्रति व्हिजीट प्रमाणे मंजुर राहील. यात सर्व बाबींचा समावेश असेल (मानधन, प्रवास भत्ता, सत्कार, जेवन, टीएडीए इत्यादी)

७) फोटोसाठी किंवा चित्रिकरणासाठी व्हिडीओ शुटींग प्रति कार्यकारी प्रतिमिटींग एकूण रुपये २०००/-

(ज्या दिवशी विशेष कार्यक्रम असेल आवश्कतेनुसार देय राहील किंवा सिडी ही कार्यालयात जमा करावी लागेल त्या दिवसासाठी) फोटो देण्यापुर्वी साफट कॉपी दाखवून त्यातील आवश्यकते फोटो सांगीतल्या प्रमाणे देण्यात येतील.

८) माहिती / सादरीकरण कार्यालयास आवश्यक असल्यास माहिती / सादीकरण (Presentation) तयार (Presentation) करुन देणे व त्याची सॉफट कापी, हार्ड कापी रंगीन दोन कॉपीज उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. अधिका-यांना अधिकच्या प्रती पाहिजे असल्यास त्याप्रमाणे झेरॉक्स चार्जेस द्यावे लागतील.

९) स्वयंसेवक मानधन प्रति महिना (किमान वेतन कायदा १ सप्टेंबर २०१५ नुसार )

२७३ प्रति मनुष्य प्रती दिवस या प्रमाणे प्रति महिला ८१९० नुसार

स्वयंसेवक संख्या = १२X८१९०=९८,२८० रुपये प्रती महिना (यात सर्वबाबींचा समावेश असेल)

१०) महानगरपालिका आयुक्त, उपआयुक्त यांनी सांगितलेल्या सर्व कामे करावे लागतील.

वरील अटी व शर्तीनुसार मे. दक्ष फाऊंडेशन नांदेड याची सर्वात कमीदराची निविदा स्विकारण्यात येते त्यांनी दिनांक १८.११.२०१६ पासुन प्रत्यक्ष अटी व शर्तीनुसार कामास सुरुवात करुन अनुपालन अहवाल वेळोवेळी सादर करावा. या बाबीवर होणारा खर्च सालसन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील १४व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीतुन करण्यात यावा **सदरील आदेशास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मनपा स्थायी समिती समोर नोंद घेणे बाबत.**

**तेहरा अनुजा** हा विषय प्रशासनाचा म्हणून आमच्यासमोर आलाय. यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत जनजागृती करणे यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यातील दक्ष फाऊंडेशनची निविदा प्रशासनाने अंतीम केली व आमच्यासमोर नोंदी करता आणलेली आहे. प्रस्तावाची भाषा पाहता आपण दक्ष फाऊंडेशनला अपॉईंट करतोय का ते महापालिकेला अपॉईंट करत आहेत हेच कळत नाहीये.

१. अटी व शर्ती मध्ये पहिलाच मुद्दा पाहा, कार्यालयासाठी जागा मनपा उपलब्ध करुन देईल आणि त्या जागेच लाईट बिल व टॅक्स संस्थेने द्यावा अस पाहिजे होत परंतु काय लिहीलय ते पाहा, "जागा मनपाने उपलब्ध करुन द्यावी व लाईट बिल, टॅक्स संस्था देईल. " याचाच अर्थ या नियम व अटींचा मसुदा प्रशासनाने तयार केलेला नाही तर जी संस्था हे काम करणार आहे त्यांनी तयार केलेला आहे.

२. स्टेशनरी करीता आपण यांना रु. ८०००/- प्रति महीना द्यायचाय त्यात ते काय करणार काहीच उल्लेख नाही. जर काही वही-पेन, ओळखपत्र देणार असतील अस म्हणाव तर त्याचाही वेगळा खर्च यांनी प्रशिक्षण सामग्री मध्ये लावलाय. मग हे या रु. ८०००/- चे काय करणार ? त्या एजन्सीला लागणा-या स्टेशनरीचे पैसे आपण द्यायचे का ?

३. प्रशिक्षण सामग्री एकूण रु. ४०,०००/- लिहीलेल आहे. यामध्ये एका व्यक्तीचा प्रशिक्षणाचा खर्च रु. २००/- लिहीलेला आहे. यामध्ये प्रशिक्षण एक व प्रशिक्षण दोन असा एकूण रु. ४०,०००/- खर्च लिहीलेला आहे. हे एक आणि दोन काय आहे ? बर यामध्ये १०० प्रशिक्षणार्थीचा खर्च लिहीलेला आहे. जर प्रशिक्षणार्थी १०० पेक्षा जास्त किंवा कमी असतील तर काय ? याचा स्पष्ट उल्लेख नाही. ( १०० पेक्षा कमी आले तर आम्हाला परवडत नाही मग आम्ही १०० चाच खर्च लावणार अस म्हणाले तर ? जर १०० पेक्षा जास्त असतील तर जेवढे जास्त होतील तेवढे पैसे लावणार अस म्हणाले तर ? ) यामध्ये K - नंबरला लिहीलय की व्हिडीओ शुटींगची एक सीडी व २० पोस्टकार्ड साईज फोटो देण्यात येतील. यावरुनही लक्षात येतय की या अटी व शर्ती संबंधीत संस्थेन मनपाला घातल्यात. याचा अर्थ ती संस्था आपली निवड करत आहे. संस्थेच्या कार्यालयाला जागा फुकट तर द्यायचीच वरतून जे काही प्रशिक्षण कार्यक्रम ही संस्था घेणार आहे त्यांना एक तर प्रशिक्षण स्थळ मोफत उपलब्ध करुन द्या किंवा ते जी जागा निवडतील त्याच भाड म्हणून रु. ७०००/- द्या. मला तर मुद्दा क्र. ३ चा अर्थ असाच दिसतो आहे.

४. यामध्ये रॅलीचा खर्च रु. २६०० /- दिलेला आहे. आता यामध्येही रॅलीचा एकूण खर्च रु. २६००/- आहे की ४ रॅलीचा खर्च रु. २६००/- आहे की या ४ रॅली एका महिण्यात निघणार का ? एक वर्षात निघणार याचा स्पष्ट उल्लेख नाही.

५. प्रचार, प्रसारासाठी अटोरिक्षा, हॅंडबिल, स्टीकर याचा खर्च रु. १६,०००/- दाखवलेला आहे.

६. जो कोणी गेस्ट प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता येईल त्याला रु. १०,०००/- द्यावे लागतील. अस महिण्यातून/वर्षातून किती वेळा होईल, याचाही स्पष्ट उल्लेखा नाही.

७. फोटो व व्हिडीओ शुटींगचा खर्च रु. २०००/- दाखवलेला आहे. हा आठवडयाला होणार, महिण्याला होणार की वर्षातून किती वेळा होणार काहीच दाखवलेल नाही.

८. या संस्थेकडून दोन प्रतींच्या वर कोणत्याही प्रकारचा प्रिंट डॉक्युमेंट, सादरीकरण अधिका-यांना पाहिजे असल्यास त्याचे चार्जेस द्यावे लागतील अस लिहीलय.

९. किमान वेतन कायद्यानुसार प्रति स्वयंसेवक रु. २७३/- द्यावे लागतील म्हणजेच १२ स्वयंसेवकांचे प्रतिमहिना 8190 प्रमाणे जवळपास एक लक्ष रुपये मानधन द्यावे लागेल. म्हणजेच महापालिकेला साडेसहा लक्ष लोकसंख्येच्या, चार झोनच्या मागे १२ माणसे म्हणजे एका झोनला ४ माणसे ही एजन्सी नियुक्त करील. अहो आम्ही 6000 रु. मध्ये रोड कारकून, 8000 रु. मध्ये इंजिनिअर, 10000 रु. मध्ये विधी अधिकारी अशा लोकांकडून काम घेतलय. तर काय आम्ही स्वयंसेवकांना 8000 रु. महिना मानधन देणार काय ?

१०. महानगरपालिका आयुक्त व उपायुक्त यांनीच सांगितलेली सर्व कामे करावी लागतील म्हणजे मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, मा. विरोधी पक्षनेता यांनी सांगितलेली/ सुचवलेली कामे करायची की नाही याचा कोणताच उल्लेख नाही.

हे झाल प्रस्तावाच विश्लेषण, जे प्रस्तावात नमूद आहे तेच मी आतापर्यंत सांगितलय. आयुक्तांनी त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार ही निविदा मान्य करुन आमच्या पुढे नोंदीकरीता आणलीय.

या प्रस्तावातील सावळा गोंधळ पाहता म्हणजे आमच्याकडून तुम्ही किती खर्चाला मान्यता घेताय / मागताय तेच कळत नाहीये. जो खर्च होणार आहे तो महिणेवारी आहे का ? वर्षाचा ? याचा कुठेच उल्लेख नाही. मग आम्ही नेमकी कोणत्या रकमेस मान्यता द्यायची ? आणि संस्था नेमक काम काय करणार ? त्याच मुल्यमापन कोण करणार याची कोणतीच माहित देण्यात आलेली नाही. जसा सविस्तर बारीक-सारीक खर्च प्रस्तावात लिहीलाय तस नेमक कामही काय घेणार हे लिहायला पाहिजे होत, परंतू ते पध्दतशीरपणे टाळण्यात आलयं.

परंतु केवळ १२ माणसं लावून महिण्याला कमीत कमी दोन लाखाला म्हणजेच वर्षाला अंदाजे २४ लाखाला चूना लावणा-या संस्थेस काम देऊ नका अशी माझी या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुचना आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानाकरीता आपल्याकडे स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. त्या कक्षाकरीता उपायुक्त, सहा.आयुक्त, सनियंत्रण अधिकारी, कार्य. अभियंता, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता, कार्यालय अधिक्षक, वरिष्ठ लिपीक, लिपीक अशा मोठया प्रमाणात स्वतंत्र

नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. वेगळयाप्रकारचे नकाशे, माहिती तयार करण्याचे नमुने, दररोजचे अहवाल चे नमुने अस वेगवेगळी माहिती आपले अधिकारी तयार करत आहेत. तसेच वेळोवेळी वेगवेगळे आदेश काढून प्रशासन वसूली लिपीकांना स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची कामे लावतेच आहे. सोशल मिडियावर जे फोटो येत आहेत. त्यामध्ये NGO चा एखाद दुसरा कर्मचारी आहे तर आमचे उपायुक्तापासुन लिपीक ते सफाई कामगारापर्यंत लोक आहेत. 26 डिसेंबरला एक आदेश काढून 100 कर्मचा-यांना उघडयावर शौचास बसणा-यांवर कार्यवाही करण्याकरीता नियुक्त करण्यात आले आहे. यामध्ये कर निरिक्षक ते बहुतांश वसुली लिपिक यांना नियुक्त करण्यात आले आहे. एवढीसारी शासकिय यंत्रणा सक्षमपणे स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी कार्यरत असतांना मार्गदर्शन करण्यासाठी एखादी एजन्सी नियुक्त करुन जनतेच्या कररुपी पैशाची उधळण करण्याची आवश्यकता नाही अशी माझी स्पष्ट धारणा आहे. भारत सरकार ते महाराष्ट्र शासन राष्ट्रीय स्तरावरील Ad Agency कडून जनतेला कळणा-या, मनाला भिडणा-या न्युज पेपर, टी.व्ही., रेडिओ, बॅनर या माध्यमातून स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या जाहिराती करतच आहेत. त्यामुळे मनपाने 14 व्य वित्त आयोगातील हा एवढा पैसा खर्च करुन वेगळयाने जाहिरात करण्याची आवश्यकता नाही. तसही आपण महाराष्ट्र शासनाचेच एक अंग आहोत.

स्थायी समिती समोर प्रशासनाने आणलेला प्रस्तावाची आम्ही नोंद घेणार नाही उलट महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ मधील तरतुदीनुसार आयुक्तांचा आदेश विखंडीतसाठी शिफारस करु कारण हा आदेश महापालिकेचया आर्थीक हिताच्या विरोधात आहे कलम ४५१ मध्ये स्पष्ट तरतुद आहे की मनपाकेच्या किंवा इतरकोणत्याही प्राधिका-याच्या (म्हणजे त्यात आयुक्तही आले) ठरावाचे किंवा आदेशाची अमलबजावणी केल्यास महापालिकेच्या आर्थीक हिताच्या विरोधात जात असेल तर त्या आदेशाची विरोधात शासनाकडे दाद मागता येईल तसेच उक्त आदेश विखंडीत करण्यासाठी शासनास शिफारस करण्यासाठी मान्यता देण्यात यावी.

**सभापती** सौ. तेहरा अनुजा अमितसिंह यांनी आयुक्तांचे आदेशाची नोंद न घेता सदरील आदेशास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ मधील तरतुदीनुसार विखंडीत करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२०** **ठराव**

आयुक्तांनी सादर केलेल्या कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/स्वमअ/११३५०/१६ दिनांक २८.११.२०१६ अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत अभियानाची जनजागृती करणे यात माहिती, शिक्षण व प्रसार (IEC) साठी निविदा सुचना क्रं. स्वमअ/१५०३५/२०१६ दिनांक १५.०२.२०१६ नुसार मागविण्यात आल्या होत्या यामध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. दक्ष फाऊंडेशन नांदेड यांची निविदा मंजुर करण्यासाठी प्रशासनाने सादर केलेल्या आदेशाची नोंद घेण्यास ही स्थायी समितीची सभा नकार देते सदर आदेश हा महापालिकेच्या आर्थीक हिताच्या विरोधात असल्यामुळे सदरील आदेश महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ मधील तरतुदीनुसार विखंडीत करण्यासाठी शासनास शिफारस करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.०३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड मलनिस्सारण योजने अंतर्गत **झोन क्रं. ब-२ शामनगर भागात मोगडपल्ली ते गोदवार यांच्या घरा पर्यंत मलप्रवाह सुरळीत होत नसल्याने कामाची तातडी व निकश लक्षात घेता उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार ४० मी. मलवाहिणी तातडीने करुन चेंबर्स चे बांधकाम करुन मलवाहिणी सुरळीत करुन घेण्यात आली. त्यासाठी रु. १,५७,६६०/-** येवढा खर्च झाला असुन झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता सालसन २०१६-१७ च्याम लनिस्सारण देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षातुन खर्च करण्यास कार्योत्तर पशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**उपआयुक्त** कायदयातील तरतुदीनुसार सर्व विभाग प्रमुखांनी विना निविदा मंजूरीचे कामे करु नये. एखादया कामाची तातडी आहे. निविदा काढणे हे शक्य नाही तर अशा वेळी स्थायी समितीस येणा-या बैठकीत विषय घेण्याबाबत विनंती करावी. स्थायी समिती मान्यता देणार आहे असे गृहीत धरुन काम करण्यात येवू नये. स्थायी समितीची आधी मान्यता घ्यावी. त्यानंतरच कामे हाती घेण्यात यावे. तीन लाखाचे कामाला केवळ सात दिवसाची निविदा प्रसिध्द करता येईल. 50 हजारापर्यत कोटेशन घेवून काम पुर्ण करुन घेता येवू शकते काम करण्यापुर्वी प्रस्ताव स्थायी समिती समोर आला पाहीजे ही काळजी सर्व विभाग प्रमुखांनी घ्यावी.

**उमेश चव्हाण** स्थायी समितीची बैठक 8 दिवसाला होत असते त्यामुळे विषय पास करुन देण्यात आम्हाला काहाही अडथळा नाही. कायदयाच्या चौकटीत राहुनच प्रशासने काम करावे. सदरील विषय हा प्रशासनाचा आहे. त्यामुळे कार्योत्तरचे सर्व विषय पास करण्यात यावेत. स्थायी समिती यानंतर कार्योतर विषय समोर ठेवू नये.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड मलनिस्सारण योजने अंतर्गत **झोन क्रं. ब-२ शामनगर भागात मोगडपल्ली ते गोदवार यांच्या घरा पर्यंत मलप्रवाह सुरळीत होत नसल्याने कामाची तातडी व निकश लक्षात घेता उपअभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार ४० मी. मलवाहिणी तातडीने करुन चेंबर्स चे बांधकाम करुन मलवाहिणी सुरळीत करुन घेण्यात आली. त्यासाठी रु. १,५७,६६०/-** येवढा खर्च झाला असुन झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता सालसन २०१६-१७ च्याम लनिस्सारण देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षातुन खर्च करण्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर पशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.०४**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पाणीपुरवठा योजने अंतर्गत **हिंगोली गेट ते देगलुरनाका पर्यंत अस्तीत्वात असलेली लाईन सालसन २०१४ मध्ये JNNURM अंतर्गत मलवाहिणी टाकतांना ४०० मी.मी. व्यासाची पाणी पुरवठा रायझींगमेन लाईन खोदकाम करतेवेळेस बाधीत झाली होती. सदर मलवाहिणीचे कंत्राटदाराने बाधीत झालेली जलवाहिणी Redeusing केली. तथापी जलवाहिणी दुरुस्तीच्या कामासाठी मलवाहिणीच्या कामात तरतुद नसल्यामुळे दुरुस्तीच्या कामाची रक्कम थकीत राहिली.**

करिता सदर कामा बाबत प्रकल्प सल्लागार ILFS यांचे अभिप्रायानुसार हिंगोली गेट ते ROB ते बाफना मोटार पर्यंत २००mm Dia काढून परत टाकण्याचे काम केले. तसेच बरकत कॉम्पलेक्स ते देगलुर नाका पर्यंत ४००mm Dia DI पाईप काढून कामाच्या जवळ स्टॉक करुन ठेवले होते. सदरील पाईप दुस-या एजन्सी मार्फत जलशुध्दीकरण केंद काबरानगर येथे पोहचुन ठेवण्यात आले. त्यासाठी सदरील काम **मे. स्वॉन इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड** यांचे कडून रास्त अंदाजपत्रक दरावर करुन घेण्यात आले. त्यास **रु. ४,५१,८००/-** खर्च झाला असुन झालेल्या खर्चास सालसनस २०१६-१७ च्या पाणीपुरवठा देखभाल दुरुसती या लेखा शिर्षातुन खर्च करण्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पाणीपुरवठा योजने अंतर्गत **हिंगोली गेट ते देगलुरनाका पर्यंत अस्तीत्वात असलेली लाईन सालसन २०१४ मध्ये JNNURM अंतर्गत मलवाहिणी टाकतांना ४०० मी.मी. व्यासाची पाणी पुरवठा रायझींगमेन लाईन खोदकाम करतेवेळेस बाधीत झाली होती. सदर मलवाहिणीचे कंत्राटदाराने बाधीत झालेली जलवाहिणी Redeusing केली. तथापी जलवाहिणी दुरुस्तीच्या कामासाठी मलवाहिणीच्या कामात तरतुद नसल्यामुळे दुरुस्तीच्या कामाची रक्कम थकीत राहिली.**

करिता सदर कामा बाबत प्रकल्प सल्लागार ILFS यांचे अभिप्रायानुसार हिंगोली गेट ते ROB ते बाफना मोटार पर्यंत २००mm Dia काढून परत टाकण्याचे काम केले. तसेच बरकत कॉम्पलेक्स ते देगलुर नाका पर्यंत ४००mm Dia DI पाईप काढून कामाच्या जवळ स्टॉक करुन ठेवले होते. सदरील पाईप दुस-या एजन्सी मार्फत जलशुध्दीकरण केंद काबरानगर येथे पोहचुन ठेवण्यात आले. त्यासाठी सदरील काम **मे. स्वॉन इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड** यांचे कडून रास्त अंदाजपत्रक दरावर करुन घेण्यात आले. त्यास **रु. ४,५१,८००/-** खर्च झाला असुन झालेल्या खर्चास सालसनस २०१६-१७ च्या पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षातुन खर्च करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.०५**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, **गोवर्धनघाट पुलावर SDBC चा एक लेअर मारणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रु. ४०,०१,३९८/- साठी** ई टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबांवि/९७३६/२०१६ दिनांक १७.१०.२०१६ अन्वये दैनिक प्रभाव (हिंदी / दैनिक नगुशे उर्दु) या वर्तमान पत्रात दिनांक १८.१०.२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्तकामासाठी एकूण ०५ (पाच) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक २९.११.२०१६ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | गुरुरामदास कन्सट्रक्शन नांदेड | १.४१% कमी दर |
| २ | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | २.४१% कमी दर |
| ३ | प्रविण कन्सट्रकशन नांदेड | ६% जास्त दर |

| | | |
|---|---|---|
| ४ | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ०.९८% कमी दर |
| ५ | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | १% कमी दर |

तुलनत्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.४१% कमी दराची आहे.**

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, **गोवर्धनघाट पुलावर SDBC चा एक लेयर मारणे बाबतच्या कामासाठी अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.४१% कमी दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या निविदा मंजुर करण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२३** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, **गोवर्धनघाट पुलावर SDBC चा एक लेअर मारणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रक रु. ४०,०१,३९८/- साठी** ई टेंडर सेल व्दारे निविदा सुचना क्रं. साबांवि/९७३६/२०१६ दिनांक १७.१०.२०१६ अन्वये दैनिक प्रभाव (हिंदी / दैनिक नगुशे उर्दु) या वर्तमान पत्रात दिनांक १८.१०.२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्तकामासाठी एकूण ०५ (पाच) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दिनांक २९.११.२०१६ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| १ | गुरुरामदास कन्सट्रक्शन नांदेड | १.४१% कमी दर |
| २ | अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | २.४१% कमी दर |
| ३ | प्रविण कन्सट्रकशन नांदेड | ६% जास्त दर |
| ४ | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ०.९८% कमी दर |
| ५ | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | १% कमी दर |

तुलनत्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.४१% कमी दराची आहे.**

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, **गोवर्धनघाट पुलावर SDBC चा एक लेयर मारणे बाबतच्या कामासाठी अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.४१% कमी दराची निविदा हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.**

**विषय क्रं.०६**

कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/विधुत/१२२४९/१६ दिनांक १५.१२.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विस्तारित माता गुजरीजी विसावा उद्यानात ८ नग ०३ मीटर टयुबूलार पोल उभारुन गार्डन लाईट बसविणे या कामासाठीचे अंदाजपत्रक खर्च रुपये ५,५४,२१३/- साठी आदेश क्रं. मनपा/उपअभि/विधुत/७०९५/२०१६ दिनांक २९.०८.२०१६ अन्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार जा.क्रं.नावाशमनपा/विधुत/ई-टेंडर/७१६१/२०१६ दिनांक ३०.०८.२०१६ व सांज दैनिक नांदेड वाता व दैनिक सहेर (उर्दु) दिनांक ३१.०८.२०१६ मध्ये निविदा प्रसिध्द बी-१ प्रपत्रात मोहरबंद निविदा ऑनलाईन टेंडर क्रं. १००७ नुसार मागविण्यात आले होते. उक्त निविदा प्रक्रिया मध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार त्रीसदस्यीय समितीची निविदा उघडण्याची मान्यता दिनांक ०६.१२.२०१६ नुसार त्रीसदस्यीय समिती समोर उघडून त्यात मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांनी सादर केलेली निविदा सर्वात कमी दराची असून जी अंदाजपत्रक दरापेक्ष ०.५०% कमी दराची असल्याने त्रीसदस्यीय समिती तर्फे शिफारस करण्यात आलेली आहे.

निविदेच्या ऑनलाईन तुलनात्मक तक्त्यानुसार मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभ्णी यांची निविदा कमी दराची असून जी अंदाजपत्रक दरापेक्ष ०.५०% कमी दराची असल्याने मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची अंदाजपत्रक दरापेक्ष ०.५०% कमी दराची निविदा उक्त आदेशाव्दारे मंजुर करण्यात आली **त्यास महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मनपा स्थायी समिती समोर नोंद घेण्यास्तव सादर.**

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेलेल्या आदेशाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. १२४** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/विधुत/१२२४९/१६ दिनांक १५.१२.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विस्तारित माता गुजरीजी विसावा उद्यानात ८ नग ०३ मीटर टयुबूलार पोल उभारुन गार्डन लाईट बसविणे या कामासाठीचे अंदाजपत्रक खर्च रुपये ५,५४,२१३/- साठी आदेश क्रं. मनपा/उपअभि/विधुत/७०९५/२०१६ दिनांक २९.०८.२०१६ अन्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार जा.क्रं.नावाशमनपा/विधुत/ई-टेंडर/७१६१/२०१६ दिनांक ३०.०८.२०१६ व सांज दैनिक नांदेड वाता व दैनिक सहेर (उर्दु) दिनांक ३१.०८.२०१६ मध्ये निविदा प्रसिध्द बी-१ प्रपत्रात मोहरबंद निविदा ऑनलाईन टेंडर क्रं. १००७ नुसार मागविण्यात आले होते. उक्त निविदा प्रक्रिया मध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार त्रीसदस्यीय समितीची निविदा उघडण्याची मान्यता दिनांक ०६.१२.२०१६ नुसार त्रीसदस्यीय समिती समोर उघडून त्यात

मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांनी सादर केलेली निविदा सर्वात कमी दराची असून जी अंदाजपत्रक दरापेक्ष ०.५०% कमी दराची असल्याने त्रीसदस्यीय समिती तर्फे शिफारस करण्यात आलेली आहे.

निविदेच्या ऑनलाईन तुलनात्मक तक्त्यानुसार मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभ्‍णी यांची निविदा कमी दराची असून जी अंदाजपत्रक दरापेक्ष ०.५०% कमी दराची असल्याने मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची अंदाजपत्रक दरापेक्ष ०.५०% कमी दराची निविदा उक्त आदेशाव्दारे मंजुर करण्यात आली **त्यास महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नोंद घेते.**

**विषय क्रं.०७**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/उद्यान/१२२०९/२०१६ दिनांक १४.१२.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत विसावा उद्यान (विस्तारीत भाग) मध्ये उद्यान विकसित करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/९४५०/२०१६ दिनांक १०.१०.२०१६ अन्वये रुपये १२,६०,१११/- ची सुधारीत प्रशासकिय आर्थीक मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार जा.क्रं. नावाशमनपा/उद्यान/९४८८/२०१६ दिनांक १०.१०.२०१६ Online Tender No. १०२८ नुसार निविदा सुचना दैनिक गोदावरी ऑब्झर्वहर, दैनिक लाकाशा दि. १४.१०.२०१६ अन्वये बी-१ प्रपत्रात मोहरबंद निविदा नुसार मागविण्यात आले होते. उक्त निविदा प्रक्रिये मध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार त्रीसदस्य समितीची निविदा उघडण्याची मान्यता दि. १८.११.२०१६ (०८.१२.२०१६) नुसार त्रिसदस्य समिती समोर उघडुन त्यात शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची निविदा सर्वात कमी असल्याने त्रिसदस्यीय समिती तर्फे शिफारस करण्यात आलेली आहे.

निविदेच्या ऑनलाईन तुलनात्मक तक्त्यानुसार शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची निविदा कमी दराची असून जी अंदाजपत्रकीय दराची असल्याने शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करण्यात आली **त्यास महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मनपा स्थायी समिती समोर नोंद घेण्यास्तव सादर.**

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेलेल्या आदेशाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. १२५** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/उद्यान/१२२०९/२०१६ दिनांक १४.१२.२०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड अंतर्गत विसावा उद्यान (विस्तारीत भाग) मध्ये उद्यान विकसित करण्यासाठी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/९४५०/२०१६ दिनांक १०.१०.२०१६ अन्वये रुपये १२,६०,१११/- ची सुधारीत प्रशासकिय आर्थीक मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार जा.क्रं. नावाशमनपा/उद्यान/९४८८/२०१६ दिनांक १०.१०.२०१६ Online Tender No. १०२८ नुसार निविदा सुचना दैनिक गोदावरी ऑब्झर्वहर, दैनिक लाकाशा दि. १४.१०.२०१६ अन्वये बी-१ प्रपत्रात मोहरबंद निविदा नुसार मागविण्यात आले होते. उक्त निविदा प्रक्रिये मध्ये एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यानुसार त्रीसदस्य समितीची निविदा उघडण्याची मान्यता दि. १८.११.२०१६ (०८.१२.२०१६) नुसार त्रिसदस्य समिती समोर उघडुन त्यात शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची निविदा सर्वात कमी असल्याने त्रिसदस्यीय समिती तर्फे शिफारस करण्यात आलेली आहे.

निविदेच्या ऑनलाईन तुलनात्मक तक्त्यानुसार शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची निविदा कमी दराची असून जी अंदाजपत्रकीय दराची असल्याने शिवाजी नामदेवराव इंगळे नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुर करण्यात आली **त्यास महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नोंद घेते.**

**विषय क्रं.०८**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **मान्सुनपुर्व रमजान ईद निमित्त झोन क मधील किरकोळ दुरुस्तीचे काम करणे व इदगाह मैदान रंगरंगोटी करण्यासाठी** कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार झालेल्या कामाचे अंदाजपत्रक **रुपये ८,००,०००/-** चे तयार करुन घेण्यात आले आहे.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम कार्यकारी अभियंता मार्फत विना निविदा रास्त पध्दतीने अदांजपत्रक दरावर **मे. माझ कन्स्ट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ८,००,०००/- यास **महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.**

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **मान्सुनपुर्व रमजान ईद निमित्त झोन क मधील किरकोळ दुरुस्तीचे काम करणे व इदगाह मैदान रंगरंगोटी करण्यासाठी** कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार झालेल्या कामाचे अंदाजपत्रक **रुपये ८,००,०००/-** चे तयार करुन घेण्यात आले आहे.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम कार्यकारी अभियंता मार्फत विना निविदा रास्त पध्दतीने अदांजपत्रक दरावर **मे. माझ कन्स्ट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ८,००,०००/- यास **महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

**विषय क्रं.०९**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **क्षेत्रीय कार्यालय क्रं. C मध्ये (१) हल्लाबोल (२) श्री शिवाजी जयंती (B) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्य किरकोळ दुरुस्तीचे काम करणेसाठी कार्यकारी** कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बार्बीचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार झालेल्या कामाचे अंदाजपत्रक **रुपये ४,९५,६३२/-** चे तयार करुन घेण्यात आले आहे.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम कार्यकारी अभियंता मार्फत विना निविदा रास्त पध्दतीने अदांजपत्रक दरावर **मे. माझ कन्स्ट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,९५,६३२/- यास **महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर.**

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **क्षेत्रीय कार्यालय क्रं. C मध्ये (१) हल्लाबोल (२) श्री शिवाजी जयंती (B) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती निमित्य किरकोळ दुरुस्तीचे काम करणेसाठी कार्यकारी** कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बार्बीचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार झालेल्या कामाचे अंदाजपत्रक **रुपये ४,९५,६३२/-** चे तयार करुन घेण्यात आले आहे.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम कार्यकारी अभियंता मार्फत विना निविदा रास्त पध्दतीने अदांजपत्रक दरावर **मे. माझ कन्स्ट्रक्शन नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ४,९५,६३२/- यास **महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

**विषय क्रं.१०**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेका-ब/२१९६/१६ दिनांक १२.१२.२०१६ अन्वये **दिनांक १७ सप्टेंबर २०१६ रोजी मराठपवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त सकाळी ८.३० वाजता माता गुजरीजी विसावा उद्यानातील स्मृतीस्तंभास मानवंदना व पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम व सकाळी ०९.०० वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यासाठी आवश्क्ती व्यवस्था करणेसाठी पावसाचे दिवस असल्यामुळे वॉटरप्रुफ मंडप, रेड कारपेट, फायबर चेअर, सोफा विथ कव्हर, साइडींग इत्यादी साहित्यासाठी** जाहीर सुचना क्रं. क्षेका-ब/१२४०/१/१६दि. ०७.०९.१६ अन्वये जाहीर सुचनेव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते त्यानुसार तिन कोटेशन प्राप्त झाले परंतु श्री सहयोग सेवा, जुना मोंढा नांदेड यांचे कोटेशन कमी दराचे असल्यामुळे कार्यालयीन आदेश क्रं, क्षेका-ब/ १३२७/१६/ दिनांक १६.०९.१६ अन्वये उकत प्रमाणे व्यवस्था करण्यासाठी संबंधीतांना आदेश देण्यात आले होते.

**श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड** यांचे बिल नं. ८१२/ दिनांक १७.०९.२०१६ नुसार उक्त प्रमाणे आवश्यक्ती व्यवस्था करणेकामी एकूण **रु. १,३२,०७७/** चे देयक सादर केलेले आहे सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे नावे अदाई करण्याकरिता कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मानयता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास मनपा स्थायी समिती समोर मान्यतेसतव सादर. सदरील खर्च सालसन २०१६-१७ च्या मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत लेखाशिर्षकातुन करण्यात यावा.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२८** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेका-ब/२१९६/१६ दिनांक १२.१२.२०१६ अन्वये **दिनांक १७ सप्टेंबर २०१६ रोजी मराठपवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त सकाळी ८.३० वाजता माता गुजरीजी विसावा उद्यानातील स्मृतीस्तंभास मानवंदना व पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम व सकाळी ०९.०० वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यासाठी आवश्क्ती व्यवस्था करणेसाठी पावसाचे दिवस असल्यामुळे वॉटरप्रुफ मंडप, रेड कारपेट, फायबर चेअर, सोफा विथ कव्हर, साइडींग इत्यादी साहित्यासाठी** जाहीर सुचना क्रं. क्षेका-ब/१२४०/१/१६दि. ०७.०९.१६ अन्वये जाहीर सुचनेव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते त्यानुसार तिन कोटेशन प्राप्त झाले परंतु श्री सहयोग सेवा, जुना मोंढा नांदेड यांचे कोटेशन कमी दराचे असल्यामुळे कार्यालयीन आदेश क्रं, क्षेका-ब/ १३२७/१६/ दिनांक १६.०९.१६ अन्वये उकत प्रमाणे व्यवस्था करण्यासाठी संबंधीतांना आदेश देण्यात आले होते.

**श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड** यांचे बिल नं. ८१२/ दिनांक १७.०९.२०१६ नुसार उक्त प्रमाणे आवश्यक्ती व्यवस्था करणेकामी एकूण **रु. १,३२,०७७/** चे देयक सादर केलेले आहे सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे नावे अदाई करण्याकरिता कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मानयता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास हि नावाशमनपा स्थायी समिती सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं.११**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. १४ विष्णुनगर येथे पांचाळ यांचे घर ते किशनाई निवास, राजु हाडकर यांचे घर ते शिवकांता भंगे यांचे घर व राजु हाडकर ते अक्षय किराणा असे तीन रस्ते नादुरुस्त होते पावसाळयाच्या

काळात रस्ते दुरुस्ती करणेसाठी या विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार रुपये ३,८७,८००/- चे अंदाजपत्रक केले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम कार्यकारी अभियंता मार्फत विना निविदा रास्त पध्दतीने अदांजपत्रक दरावर **पठाण मोईज अहेमद खान नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ३,८७,८००/- यास **महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर निर्णयास्त्व सादर.**

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १२९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं. १४ विष्णुनगर येथे पांचाळ यांचे घर ते किशनाई निवास, राजु हाडकर यांचे घर ते शिवकांता भंगे यांचे घर व राजु हाडकर ते अक्षय किराणा असे तीन रस्ते नादुरुस्त होते पावसाळयाच्या काळात रस्ते दुरुस्ती करणेसाठी या विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार रुपये ३,८७,८००/- चे अंदाजपत्रक केले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम कार्यकारी अभियंता मार्फत विना निविदा रास्त पध्दतीने अदांजपत्रक दरावर **पठाण मोईज अहेमद खान नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रु. ३,८७,८००/- यास **महाराष्ट्र महानरगपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

**विषय क्रं.१२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड पंपिंग मशीनरी देखभाल दुरुस्ती करिता **झोन क्रं. १ अंतर्गत असदवन पाणी पुरवठा जलशुध्दीकरण केंद्र येथील विधुत व्यवस्थेच्या कामा करिता कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार असदवन पाणीपुरवठा जलशुध्दीकरण केंद्र येथुन सिडको, हाडको, असदवन, वाघाळा, कौठा, असर्जन येथे पाणी पुरवठा करण्यात येतो सदरील ठिकाणी १२० HP चे तीन मोटारी दिनांक १४.०२.२०१५ ते २३.०२.२०१६ या दरम्यान मंजुर सिलिंग दरावर मे. दिलीप इलेक्ट्रीकल्स वर्कस नांदेड यांच्याकडून तातडीने करुन घेण्यात आले त्यास रुपये २,४६,३४८/-** ऐवढा खर्च झाला असुन झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मान्यता सालसन २०१६-१७ च्या देखभाल दुरुस्ती व पंपिंग दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन खर्च करण्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण-५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १३०** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड पंपिंग मशीनरी देखभाल दुरुस्ती करिता **झोन क्रं. १ अंतर्गत असदवन पाणी पुरवठा जलशुध्दीकरण केंद्र येथील विधुत व्यवस्थेच्या कामा करिता कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार असदवन पाणीपुरवठा जलशुध्दीकरण केंद्र येथुन सिडको, हाडको, असदवन, वाघाळा, कौठा, असर्जन येथे पाणी पुरवठा करण्यात येतो सदरील ठिकाणी १२० HP चे तीन मोटारी दिनांक १४.०२.२०१५ ते २३.०२.२०१६ या दरम्यान मंजुर सिलिंग दरावर मे. दिलीप इलेक्ट्रीकल्स वर्कस नांदेड यांच्याकडून तातडीने करुन घेण्यात आले त्यास रुपये २,४६,३४८/-** ऐवढा खर्च झाला असुन झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व आर्थीक मान्यता सालसन २०१६-१७ च्या देखभाल दुरुस्ती व पंपिंग दुरुस्ती या लेखा शिर्षकातुन खर्च करण्यास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची ड प्रकरण-५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.१३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **श्री गुरु गोविंदसिंघजी क्रिकेट स्टेडीयम येथील जॉंगीग ट्रॅक वर सिंटेथिक सरफेसचे काम करणे (Synthetic Pattern)** साठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन या मैदानाच्या वायर फेन्सींग लगत व प्रेक्षक गॅलरीच्या दरम्यान ६२०x२.५० आकराचे क्षेत्र हे Jogging प्रमाणे Synthetic Material वापरुन Jogging Trak तयार करणे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार रुपये ४६,६०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

करिता नावाशमनपा हद्दीत श्री गुरु गोविंदसिंघजी क्रिकेट स्टेडियम येथील जॉंगीग ट्रॅक वर सिंटेथिक सरफेसचे काम करणे (Synthetic Pattern) या कामासाठी लागणारी रक्कम रुपये ४६,६०,५००/- (अक्षरी रुये सेहेचाळीस लक्ष साठ हजार पाचशे फक्त) यास अर्थसंकल्प २०१६-१७ मधील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम विकसीत करणे या लेखाशिर्षातुन प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती समोर सादर.

**जयश्री जाधव** 2016-17 च्या आर्थिक वर्षामध्ये श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयमचा विकास करण्यासाठी एक कोटीची तरतुद ठेवली आहे. त्या कोटी रुपयात स्टेडीयम कोणती कोणती कामे पुर्ण केली याचा खुलासा करण्यात यावा. हे काम 43 लक्ष रुपयाचे आहे. ही रक्कम एक कोटी रुपया व्यतिरीक्त आहे काय याचा खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता(सांबावि)** आजपर्यत 23 लक्ष रुपये खर्च झालेले आहेत याबाबत माहिती सभागृहाला सादर करण्यात येईल.

**सभापती** स्टेडीयम बाबतची माहिती संबंधीत विभागाने लेखी स्वरुपात स.सदस्यांना देण्यात यावी. तसेच आयुक्तांनी सादर केलेल्या प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्या बाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १३१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत **श्री गुरु गोविंदसिंघजी क्रिकेट स्टेडीयम येथील जॉगींग ट्रॅक वर सिटेंथिक सरफेसचे काम करणे (Synthetic Pattern)** साठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन या मैदानाच्या वायर फेन्सींग लगत व प्रेक्षक गॅलरीच्या दरम्यान ६२०x२.५० आकराचे क्षेत्र हे Jogging प्रमाणे Synthetic Material वापरुन Jogging Trak तयार करणे असल्यामुळे आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार रुपये ४६,६०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

करिता नावाशमनपा हद्दीत श्री गुरु गोविंदसिंघजी क्रिकेट स्टेडियम येथील जॉंगींग ट्रॅक वर सिंटेथिक सरफेसचे काम करणे (Synthetic Pattern) या कामासाठी लागणारी रक्कम रुपये ४६,६०,५००/- (अक्षरी रुये सेहेचाळीस लक्ष साठ हजार पाचशे फक्त) यास अर्थसंकल्प २०१६-१७ मधील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम विकसीत करणे या लेखाशिर्षातुन प्रशासकीय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.१४** **प्रस्ताव**

प्रभाग क्रं. ३२ मध्ये होळी कुंभार टेकडी भागात ड्रेनेज लाईन पुर्ण विस्कळीत पडल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे व पाणी कांही घरा पर्यंत जात नसल्यामुळे खालील ठिकाणी नविन लाईन टाकण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

१) विनोद पोलावार यांचे घरा पासुन ते राजुरकर यांचे घरा पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.
२) जागीरदार यांचे घरा पासुन ते डॉ. तळणकर यांचे दवाखान्या पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे
३) सराफा भागात आनंद ज्वेलर्स ते पेन्सलवार यांच्या घरा पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे
४) पाठक गल्ली भागात १०० मी.मी. पाण्याची पाईप लाईन टाकणे.

**सुचक** :- गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल **अनुमोदक** :- जयश्री आनंद जाधव

**गुरुखुदे सुंदरलाल** माझ्या प्रस्तावात पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. प्रभाग क्रं. ३२ मध्ये होळी कुंभार टेकडी भागात ड्रेनेज लाईन पुर्ण विस्कळीत पडल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे व पाणी कांही घरा पर्यंत जात नसल्यामुळे व कांही रस्ते पुर्णपणे नादुरुस्त झाल्यामुळे खालील ठिकाणी रस्ते नविन लाईन टाकणे अशी दुरुस्ती करुन त्यास मान्यता देण्यात यावी

१) भोजालाल गवळी चौक ते जैन मंदिर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.
२) बागवान गल्ली मस्जीद ते सराफा मेन रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे
३) बागवान गल्ली मस्जीद ते मन्सुर खान हवेली पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.
४) अरब गल्ली मस्जीद ते होळी कृष्णा मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.

**सभापती** स. सदस्यांचा दुरुस्ती प्रस्तावासह मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. १३२** **ठराव**

प्रभाग क्रं. ३२ मध्ये होळी कुंभार टेकडी भागात ड्रेनेज लाईन पुर्ण विस्कळीत पडल्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे व पाणी कांही घरा पर्यंत जात नसल्यामुळे व कांही रस्ते पुर्णपणे नादुरुस्त झाल्यामुळे खालील ठिकाणी रस्ते नविन लाईन टाकण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

१) विनोद पोलावार यांचे घरा पासुन ते राजुरकर यांचे घरा पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे.
२) जागीरदार यांचे घरा पासुन ते डॉ. तळणकर यांचे दवाखान्या पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे
३) सराफा भागात आनंद ज्वेलर्स ते पेन्सलवार यांच्या घरा पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे
४) पाठक गल्ली भागात १०० मी.मी. पाण्याची पाईप लाईन टाकणे.
५) भोजालाल गवळी चौक ते जैन मंदिर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.
६) बागवान गल्ली मस्जीद ते सराफा मेन रोड पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे
७) बागवान गल्ली मस्जीद ते मन्सुर खान हवेली पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.
८) अरब गल्ली मस्जीद ते होळी कृष्णा मंदिर पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.

**विषय क्रं.१५** **प्रस्ताव**

मनपा मालकीच्या इमारतीमधील विधुत देखभाल दुरुस्ती करिता २ वर्षा करिता एशियन इलेक्ट्रीकल्स ही एजन्सी नियुक्ती करण्यात आलेली होती सदर एजन्सी नियुक्त झाल्यापासुन त्यांना आपण दिलेल्या देयकांची (Net Payable) ची माहिती देण्यात यावी.

सदरील एजन्सीची दोन वर्षाची मुदतवाढ डिसेंबर-२०१६ मध्ये संपलेली असतांना देखील ती एजन्सी कोणाच्या आदेशान्वये आजपर्यंत काम करत आहे तसेच मुदतवाढ डिसेंबर-२०१६ मध्ये संपत असल्याचे माहिती असतांना देखील फेरनिविदा का काढण्यात आली नाही याचाही खुलासा करण्यात यावा या एजन्सी सोबत करारनामा करतांना वारंटी / गॅरंटी च्या मुद्दानुसार त्यांनी मनपाकेला आतापर्यंत कोणकोणते पार्ट बदलुन दिले याचीही माहिती सभागृहासमोर सादर करावी करिता प्रसताव सादर.

**सुचक:-** उमेश चव्हाण **अनुमोदक** :- सौ. सोनाबाई मोकले

**उपआयुक्त तथा प्राधिकृत अधिकारी** प्रस्तावाच्या अनुषंगाने सदरची माहिती पुढील सभेत देण्यात येईल.

**सभापती** उपआयुक्तांनी सांगीतल्या प्रमाणे एशिन इलेक्ट्रीकल्स एजन्सीची सविस्तर माहिती प्रशासनाने पुढील सभेत सादर करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं. १३३** **ठराव**

मनपा मालकीच्या इमारतीमधील विधुत देखभाल दुरुस्ती करिता २ वर्षा करिता एशियन इलेक्ट्रीकल्स ही एजन्सी नियुक्ती करण्यात आलेली होती सदर एजन्सी नियुक्त झाल्यापासुन त्यांना आपण दिलेल्या देयकांची (Net Payable) ची माहिती देण्यात यावी.

सदरील एजन्सीची दोन वर्षाची मुदतवाढ डिसेंबर-२०१६ मध्ये संपलेली असतांना देखील ती एजन्सी कोणाच्या आदेशान्वये आजपर्यंत काम करत आहे तसेच मुदतवाढ डिसेंबर-२०१६ मध्ये संपत असल्याचे माहिती असतांना देखील फेरनिविदा का काढण्यात आली नाही याचाही खुलासा करण्यात यावा या एजन्सी सोबत करारनामा करतांना वारंटी / गॅरंटी च्या मुद्दानुसार त्यांनी मनपाकेला आतापर्यंत कोणकोणते पार्ट बदलुन दिले या बाबतची सविस्तर मुद्देनिहाय माहिती पुढील सभेत प्रशासनाने सादर करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**सभापाती**
स्थायी समिती
नावाशमनपा नांदेड